जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2021
लोकमत

# कुलसचिव, परीक्षा मंडळासाठी १२४ अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदासाठी ७३, तर परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदासाठी ५१ अर्ज दाखल झाले आहेत. या पदांसाठीची स्थळ प्रत (हार्डकॉपी) जमा करण्याची मुदत सोमवारी संपली. कुलसचिव, परीक्षा मंडळ व मूल्यमापन मंडळ, निरंतर शिक्षण विभाग, क्रीडा विभाग, इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटरचे संचालक, विज्ञान आणि तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र, आंतरविद्या शाखा, मानव्यशास्त्र शाखांचे अधिष्ठाता पदांच्या नियुक्तीची प्रक्रिया विद्यापीठ प्रशासनाकडून गेल्या दीड महिन्यापासून सुरू आहे.

या पदांसाठी एकूण पाचशे जणांनी ऑनलाईन अर्ज भरले आहेत. ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांनी स्थळ प्रत विद्यापीठात जमा करण्याची मुदत सोमवारपर्यंत होती. या मुदतीमध्ये कुलसचिवपदासाठी ७३ आणि परीक्षा मंडळाच्या संचालकपदासाठी ५१ जणांचे अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज करण्याची मुदत संपल्यानंतर आता प्रशासनाकडून छाननीची प्रक्रिया होणार आहे.

13 JUL 2021

लोकमत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सव ऑनलाईन रंगला

## न्यू कॉलेजला यजमानपद : ४५० स्पर्धकांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाचा प्रादुर्भाव कायम असल्याने शिवाजी विद्यापीठाचा यावर्षीचा कोल्हापूर जिल्ह्याचा ४० वा युवा महोत्सव सोमवारी ऑनलाईन सुरू झाला. त्यात विविध १९ कला प्रकारांमध्ये ४५० स्पर्धेक सहभागी झाले. न्यू कॉलेजने या महोत्सवाचे संयोजन केले. या महोत्सवाचा बुधवारी समारोप होणार आहे.



जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या ऑनलाईन उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी न्यू कॉलेजचे प्रा. आर. डी. ढमकले, ए. एम. शेख, के. जी. पाटील, व्ही. एम. पाटील उपस्थित होते.

उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे अध्यक्ष के. जी. पाटील होते. उत्तम आरोग्याबरोबर कलांचा आस्वाद घेऊन आपले जीवन अधिक समृद्ध करू शकतो. त्यामुळे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने कलाप्रकारांचा आविष्कार घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. भविष्यात विद्यापीठ आणि न्यू कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवावेत, असे आवाहन के. जी. पाटील यांनी केले. यावेळी संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी मार्गदर्शन केले. आर. डी. ढमकले यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य ए. एम. शेख यांनी आभार मानले. दरम्यान, उद्घाटनानंतर रांगोळी स्पर्धेने महोत्सवाची सुरुवात झाली. मराठी, हिंदी वक्तृत्व, शास्त्रीय गायन, नृत्य, सूरवाद्य आणि व्यंगचित्र स्पर्धा रंगली. त्यात सुमारे १२५ स्पर्धेक सहभागी झाले.

13 JUL 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कला, आरोग्य परस्परास पूरकच

## कुलगुरू डॉ. शिर्के; न्यू कॉलेजमध्ये ऑनलाईन जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उत्तम आरोग्य व कला यांचा परस्परांशी संबंध आहे. उत्तम आरोग्यामुळे कलांचा आस्वाद घेऊन जीवन समृद्ध करू शकतो. यामुळे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने आरोग्याची काळजी घेऊन विविध कलाप्रकारांचा आविष्कार करावा. याचा आस्वाद ऑनलाईनच्या माध्यमातून घ्यावा, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग आण श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने ४० व्या युवा महोत्सवाचे उद्घाटन ऑनलाईन पद्धतीने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच ऑनलाईन पद्धतीने युवा महोत्सवाचे आयोजन केले आहे. गेले काही महिने कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थी तणावाखाली आहेत. युवा महोत्सव आयोजित करण्याची परंपरा आहे. युवा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळत आहे.



**कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय ऑनलाईन युवा महोत्सव उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी के.जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रा. आर. डी. ढमकले आदी.**

अध्यक्षस्थानावरून बोलताना श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील यांनी विद्यार्थ्यांनी कोरानाच्या संसर्गामध्ये व प्रतिकूल परिस्थितीत सहभाग घेतल्याचे सांगितले. भविष्यात शिवाजी विद्यापीठ व न्यू कॉलेज यांनी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. स्वागत न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी युवा महोत्सवाच्या तयारीचा आढावा घेतला. सूत्रसंचालन प्रा. आर. डी. ढमकले यांनी केले. उपप्राचार्य डॉ.ए.एम. शेख यांनी आभार मानले.

युवा महोत्सवांतर्गत विविध ११ वैयक्तिक कलाप्रकरांचा समावेश करण्यात आला आहे. सोमवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत रांगोळी, वक्तृत्व हिंदी व मराठी, सुगम गायन, शास्त्रीय गायन, सुरवाद्य, व्यंगचित्र स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने झाल्या. यात १७० विद्यार्थी सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांनी युवा महोत्सवात पहिल्यांदाच प्रत्यक्ष व्यासपीठाऐवजी घरी बसून व इतर ठिकाणांहून मोबाईल व लॅपटॉपच्या सहाय्याने कलेचे ऑनलाईन सादरीकरण केले. परीक्षकांनी ऑनलाईन परीक्षण केले. युवा महोत्सवासाठी न्यू कॉलेजमध्ये डिजिटल कंट्रोल रूम उभारण्यात आली. उर्वरित स्पर्धा मंगळवारी सकाळी ९ वाजता घेण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2021
पुढारी



# शिवाजी विद्यापीठ ऑनलाईन परीक्षेला १०२४ विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे अधिविभाग, संलग्नित महाविद्यालये, दूरशिक्षण केंद्राकडील आयोजित पुनर्परीक्षेंतर्गत सोमवारी १०२४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विद्यापीठ परीक्षा विभागातर्फे सोमवारी बीए, बीकॉम, बीएस्सी, एमए, एमकॉम, बीबीए, बीसीए, एमसीए, एमएसडब्ल्यू, बी.व्होक., बीटेक, बीएस्सी, एमएस्सी, नॅनो सायन्स, एमबीए इन रुरल मॅनेजमेंट, जर्नालिझम, पीजी डिग्री इन मास्टर ऑफ इव्हॅल्युशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2021

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग व न्यू कॉलेज, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने चाळीसावा युवा महोत्सव ऑनलाईन पद्धतीने दि. १२ ते १४ जुलैदरम्यान आयोजित केलेला आहे. महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ऑनलाईन डिजिटल प्लॅटफॉर्मवर झाले. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील अध्यक्षस्थानी होते. न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत केले. प्रास्ताविक शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले. के. जी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. रघुनाथ ढमकले यांनी केले. न्यू कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. एम. ए. शेख यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2021
सकाळ

# कोविड काळात तणावाचे योग्य व्यवस्थापन करावे : डॉ. हिर्डेकर

टेंबलाईवाडी, ता. १२ : कोविड-१९ मुळे विद्यापीठ प्रशासनालाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना विविध प्रकारच्या ताणतणावाला सामोरे जावे लागत आहे. याचा परिणाम मानसिक आरोग्याबरोबर शारीरिक आरोग्यावर होत आहे. यासाठी या ताणतणावाचे योग्य व्यवस्थापन करण्याचे कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी व्यक्त केले.



शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ सेवक संघ, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे महाराष्ट्रातील विद्यापीठ कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी कोविड काळातील व्यवस्थापन यावरील पाच दिवसीय व्याख्यानमाला सुरु आहे.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, ''आज सर्वच क्षेत्रांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून, शिक्षण क्षेत्र अपवाद राहिले नाही. आज प्रत्येक क्षेत्रातील प्रशासनासमोर समस्या आहेत. अशा परिस्थितीत खचून न जाता योग्य नियोजन, मानसिक समायोजन, सकारात्मक दृष्टिकोनाचा अवलंब करून आपण कार्यरत राहावे. जेणेकरून आपल्या कामाचा जास्त ताण येणार नाही. व्यक्तीला येणारा तणाव हा इतर कारणामुळे कमी परंतु, त्या व्यक्तीच्या नकारात्मक दृष्टिकोनातून जास्त तणाव निर्माण होत असतो. यासाठी परिस्थितीकडे सकारात्मक दृष्टीने पाहा.''

अतुल एतवाडकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. ए. एम. गुरव, बाबा सावंत उपस्थित होते.

# एमबीए डीटीई सीईटीबाबत उद्या वेबिनारचे आयोजन

गांधीनगर, ता. १२ : एमबीएच्या डीटीई सीईटीबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मॅनेजमेंट टीचर्स असोसिएशन (सुम्टा) यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (ता. १४) सकाळी दहा वाजता वेबिनारचे आयोजन केले आहे. या वेबिनारमध्ये एमबीए आणि सीईटीबाबत मार्गदर्शन होणार आहे, अशी माहिती सुम्टाचे सचिव प्रा. डॉ. विनोद बाबर यांनी दिली.

एमबीएच्या प्रवेशासाठी डीटीईची प्रवेश परीक्षा द्यावी लागते. यासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख १७ जुलै आहे. पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेस बसलेले किंवा पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी-विद्यार्थिनी ही प्रवेश परीक्षा देऊ शकतात.

विद्यार्थ्यांनी www.mahacet.org या संकेतस्थळावर जाऊन प्रवेश परीक्षेचे अर्ज भरावेत. या वेबिनारला वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. एस. एस. महाजन हे उपस्थित असणार आहेत, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्ष आहेत.

# 'ग्रामीण अभ्यासक्रमातील रोजगाराच्या संधी'वर वेबिनार

टेंबलाईवाडी, ता. १२ : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या मास्टर ऑफ रूरल स्टडीज अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, ग्राम विकासात करिअर करण्याची संधी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागात उपलब्ध आहे.

महितीसाठी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in संकेतस्थळावर भेट द्यावी. अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख २३ जुलैला आहे. विभागामार्फत १५ जुलैला 'ग्रामीण अभ्यासक्रमातील रोजगाराच्या संधी' यावर वेबिनार होणार आहे.

13 JUL 2021
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन कलाविष्कार

## कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

युवा महोत्सव म्हटले की यजमान महाविद्यालय परिसरात हिरवळ फुललेली असते. मोठ्या उत्सवात वक्तृत्व, वादविवाद, पथनाट्य, लोककला यासह सर्वच प्रकारचे सादरीकरण सुरू असते. लोकनृत्याच्यावेळी तोबा गर्दीत टाळ्या आणि शिट्या ऐकायला मिळायच्या. एखाद्या लोकनृत्यावर तरुणाई थिरकायची. यंदा मात्र कोरोनाच्या सावटाखाली ऑनलाईन युवा महोत्सवात यातले काहीच पाहायला मिळाले नाही. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी ऑनलाईन कलाविष्कार करण्यात समाधान मानले.

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास केंद्रांतर्गत होणाऱ्या कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे यजमानपद प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेजला देण्यात आले. या ऑनलाईन युवा महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले.




कोल्हापूर : युवा महोत्सवाचे उद्घाटन करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. ए. एम. शेख आदी.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासामध्ये प्रथमच ऑनलाईन पध्दतीने युवा महोत्सव आयोजित केलेला आहे. गेले काही महिने कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थी तणावाखाली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी युवा महोत्सवाचे आयोजन केले आहे. आरोग्यदायी जीवन जगत विद्यार्थ्यांनी कलांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. न्यू कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये पहिला ऑनलाईन युवा महोत्सव झाल्याने कॉलेज परिसरात आनंदाचे वातावरण होते. युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी युवा महोत्सवाचा आढावा घेतला. युवा महोत्सवात १९ कला प्रकारांमध्ये ४५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवल्याचे सांगितले. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील होते. उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. आर. डी. ढमकले यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2021
तरुण भारत

# पेठ वडगावात रुसा अंतर्गत उद्यापासून चर्चासत्र

प्रतिनिधी
पेठ वडगाव

श्री शाहू शिक्षण प्रसारक सेवा मंडळ संचलित श्री विजयसिंह यादव महाविद्यालय पेठ वडगांवमध्ये राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा), महाराष्ट्र आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, विजयसिंह यादव महाविद्यालय यांच्या विद्यमाने १४ ते १६ जुलै दरम्यान तीन दिवसीय विद्यापीठ स्तरीय ऑनलाईन चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उच्च शिक्षणातील सहभाग व योगदान यावर आधारित या चर्चासत्राचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष व माजी पोलीस आयुक्त गुलाबराव पोळ असणार आहेत. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, महाराष्ट्रचे प्रमुख सल्लागार डॉ. विजय जोशी हे मार्गदर्शन करणार आहेत. रूसाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. प्रमोद पाब्रेकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. १४ जुलै रोजी पहिल्या सत्रात शैक्षणिक नियोजन आणि मूल्यांकन प्रक्रियेमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिका यावर माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत रावळ, दुसऱ्या सत्रात डिजिटल कार्यालयीन व्यवस्थापन, विविध कागदपत्रे आणि नोंदी देखभाल यावर श्रीमती केया मुखर्जी (मणीबेन नानावटी महाविद्यालय, मुंबई) मार्गदर्शन करणार आहेत.

१५ जुलै रोजी पहिल्या सत्रात रवींद्र भोसले (प्रबंधक, श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय) हे कार्यालयीन व इतर कामकाज, दुसऱ्या सत्रात शिक्षक केंद्रित कार्यालयीन व्यवस्थापन यावर डॉ. विलास शिंदे (उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ), तिसर्या सत्रात रमेश लिधडे (उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ) हे निधी व्यवस्थापन तर चौथ्या सत्रात डॉ. अशोककुमार उबाळे (सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग ) हे सहसंचालक कार्यालयाच्या महाविद्यालयाकडून अपेक्षा यावर मार्गदर्शन करणार आहेत.

१६ जुलै रोजी पहिल्या सत्रात डॉ. प्रमोद पाब्रेकर (वरिष्ठ सल्लागार सा. महाराष्ट्र) हे विद्यार्थी केंद्रित कार्यालयीन व्यवस्थापन आणि विविध पदाधिकाऱ्यांची भूमिका व जबाबदाऱ्या, दुसऱ्या सत्रात मूल्यांकनाच्या दृष्टिकोनातून विविध लेखाजोगे संबंधित माहिती यावर आरती महाडीक (मणीबेन नानावटी महाविद्यालय, मुंबई) मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्राची वेळ सकाळी ९.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत आहे. चर्चासत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. विजया चव्हाण यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2021
तरूण भारत

# 'मानवी हक्क' ऑनलाईन कार्यशाळेस प्रतिसाद

**इचलकरंजी :** शिवाजी विद्यापीठ, अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग आयोजित व पेठ वडगावच्या विजयसिंह यादव कॉलेज क्लस्टर अंतर्गत मानवी हक्क – इतिहास, पार्श्वभूमी, संरक्षण व उल्लंघन यावर ऑनलाईन कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात शिवाजी विद्यापीठचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. रविंद्र भणगे यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेची मानवी हक्क संरक्षणामध्ये असणारी मध्यवर्ती भूमिका विषद केली. तसेच सध्या जगात काही बड्या राष्ट्रांच्या मनमानी कारभारामुळे मानवी हक्कांवर होत असलेले आक्रमण हे धोकादायक असल्याचे सांगितले. समाजवादी प्रबोधिनीचे सरचिटणीस प्रसाद कुलकर्णी, प्रा. वर्षा पोतदार यांनी मार्गदर्शन केले.